# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय**
**रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट क्रमांक ८०-२२** **दिनांक - ०९/०३/२०२२**

## मैत्रीणीने वेळोवेळी केलेल्या पैशाच्या मागणीला वैतागून आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्या तरुणाचे प्रसंगावधान राखून पोलीसांनी वाचवले प्राण.

हरियाणा येथील राहूल राठी (बदललेले नांव) वय २० वर्षे रा. कर्नाल, हरियाणा यास सुमारे ०३ वर्षांपासुन मोबाईलवर पब्जी गेम खेळण्याची सवय असल्याने सुमारे ०१ वर्षापुर्वी नायगांव पुर्व येथे राहणाऱ्या एका मुलीशी त्याची ओळख पब्जी मोबाईल गेमचे मार्फतीने झाली होती. पब्जी गेम खेळताना पैशांची आवश्यकता असल्याने सदर मुलीने राहूल याचेकडे सुरुवातीला पैशांची मागणी केल्याने त्याने सदर मुलीच्या गेमचे अकाऊंटमध्ये पैसे पाठविण्यास सुरुवात केली. सदर मुलाने मार्च २०२१ पासुन माहे जानेवारी २०२२ पर्यंत वेळोवेळी अंदाजे २० ते २५ हजार रुपये पाठविले होते. त्यानंतरही सदरची मुलगी वारंवार त्याचेकडे पैशांची मागणी करीत असल्याने त्याने अधिक पैसे देण्यास नकार दिला असता दिनांक ०६.०३.२०२२ रोजी सदर मुलीने स्वतःचा हात कापल्याचे फोटो राहूल याला पाठवुन आणखी पैशांची मागणी केल्याने तो घाबरुन त्या रात्रौ हरीयाणा येथुन वसई, नायगांव पुर्व येथे आला होता.

दिनांक ०८.०३.२०२२ रोजी सकाळी ०८.३९ वा चे सुमारास सदर मुलीने डायल ११२ वर कॉल करुन सदरचा इसम नामे राहूल राठी (बदललेले नांव) हा त्यांचे बिल्डींग परिसरात आत्महत्येचा प्रयत्न करीत असल्याचे कळविल्याने सदर ठिकाणी पोना/०६१८० समीर पाटील हे लागलीच पोहोचले. त्यावेळी राहूल राठी हा आपल्या हातातील ब्लेड त्याचे गळयाचे कंठाजवळ लावुन, 'मी आत्महत्या करणार आहे' असे बोलुन पोलीसांना जवळ येण्यास मनाई करीत होता. त्यावेळी पोना. समीर पाटील व थोडया वेळाने पोहोचलेले पोशि. चौगुले यांनी प्रसंगावधान दाखवुन राहूल यास शिताफिने ताब्यात घेवुन त्यास आत्महत्या करण्यापासून परावृत्त केले. त्यानंतर पोलीसांनी त्याचेकडे सखोल विचारपूस केली असता वरील प्रकार लक्षात आल्याने त्याचे वडिलांशी संपर्क साधून त्यांना वालीव पोलीस ठाणे येथे बोलावून घेतले व त्यांच्या मुलास दिनांक ०९.०३.२०२२ रोजी रात्रो १२.३० वा त्यांचे ताब्यात दिले.

राहूल राठी याचे वडिलांनी सदर घटनेबाबत सदर मुलगी व इतर व्यक्तींविरुध्द तक्रार दिल्याने ठाणा सिव्हील लाईन, कर्नाल, राज्य हरीयाणा येथे गुरनं १११/२०२२ भादंविस कलम ३८४, ३४६ प्रमाणे गुन्हा दाखल असल्याचे समजुन आले आहे.

डायल ११२ वर आलेल्या कॉलला वालीव पोलीसांनी तात्काळ प्रतिसाद देवून दाखविलेली तत्परता व प्रसंगावधानामुळे राहूल यास आत्महत्येपासुन परावृत्त करुन त्याचा जीव वाचविला आहे.

सदरील प्रशंसनिय कार्यवाहीबद्दल वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी पोलीस अंमलदार समीर पाटील व चौगुले यांचे अभिनंदन केले आहे.